
Visiting Hours For Visitors
17:00 To 19:00
अभ्यागतांसाठी भेटीची वेळ
सायंकाळी 17:00 ते 19:00
प्रभारी अधिकारी कक्ष
नोटीस बोर्ड
AXIS BANK
तक्रार निवारण
स्वागत कक्ष
स्वच्छता राखा

प्रेस नोट

जळगाव तालुका पोस्टे, जळगाव
दि.२०/०६/२०२६

प्रती,

मा.संपादक सो,

--------------------------------------

**विषय :- जळगाव तालुका पोलिसांची १२ तासांच्या आत धडक कारवाई जळगाव तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीत जळगाव भुसावळ बायपास रोडवर ट्रक चालकाला अडवून, चाकूने वार करत जबरदस्तीने लूट करणाऱ्या अट्टल गुन्हेगार टोळीचा जळगाव तालुका पोलीसांनी पदार्फाश केला बाबत..**

**महोदय,**

दिनांक २०/०६/२०२६ रोजी रात्री ०१:०० वाजेच्या सुमारास फिर्यादी मुकेश रामराव राठोड वय ३० व्यवसाय -चालक रा गांधी चौक हरीओम नग महानगर पालीका मागे जालना हा त्याच्या ताब्यातील ट्रक क्र MH-२१-BH-३५३६ घेवून पाळधी जवळून जात असतांना, चारचाकी व दुचाकी वरून आलेल्या ४ अज्ञात आरोपींनी त्यांचा ट्रक अडवला, मुख्य आरोपी शेख साहील शेख जब्बार उर्फ काल्या व ३ साथीदारांनी ट्रकवर दगडफेक केली . तसेच फिर्यादी व क्लीनरला बेदम मारहाण करत, एका आरोपीने फिर्यादीच्या उजव्या हातावर चाकूने तीन वेळा वार करून गंभीर दुखापत केली. आरोपींनी फिर्यादीच्या खिशातील ५५००/- रुपये रोख आणि मोबाईल फोन पे (PhonPe) स्कॅनरव्दारे ऑनलाईन ९८४/- रुपये जबरदस्तीने ट्रान्सफर करून घेतले व घटनास्थळावरून फरार झाले. जख्मी चालकावर सिव्हिल हॉस्पीटल, जळगाव येथे उपचार सुरू आहे.

फिर्यादीचे जबाबावरून जळगाव तालुका पोलीस ठाण्यात गुरन १८८/२०२६ नुसार भारतीय न्याय सहिंता (BNS) कलम ३०९(६),१२६(२),११५(२), ,३५१(२),३५१(३).३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून जळगाव तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत पाटील यांनी डीबी (DB) पथक त्वरित रवाना करुन पथकाने अत्यंत कसोशीने व गुप्त माहितीच्या आधारे शोध घेत अवघ्या १२ तासांच्या आत ०३ मुख्य आरोपीं जेरबंद केले व व १ विधीसंघर्षीत बालक यास ताब्यात घेतले.
अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे व गुन्हेगारी पार्श्वभूमी

१. साहिल शेख जब्बार शेख उर्फ काल्या (वय-२६ वर्ष रा. पाळधी, भवानी मंदीरासमोर, ता. धरणगांव जळगाव मुख्य-आरोपी)
२. विशाल चुडामण पाटील (वय १८, रा. हॉटेल साई पॅलेस मागे, बिबा नगर, जळगाव)
३. मोहित हेमंत गुजर (वय १९, रा. प्लॉट नंबर ४५, मयून कॉलनी, पिंप्राळा, जळगाव)

**४. सदर गुन्हयातील चौथा आरोपी विधीसंघर्ष बालक असून त्यास देखील ताब्यात घेण्यात आले आहे.**

त्यापैकी अटक करण्यात आलेले **आरोपी क्र १ साहिल शेख जब्बार शेख उर्फ काल्या हा सराईत गुन्हेगार असून** त्याच्यावर धरणगाव पोलीस स्टेशन येथे बस अडवून बस चालकास माराहण केल्या प्रकरणी अपराध क्र. ३९९/२०२२ IPC कलम ३५३, १४३,१४७,१४९,५०४,५०६ अन्वये गुन्हा दाखल आहे.

तसेच **आरोपी क्र. ०२ विशाल चुडामण पाटील** याचेवर देखील रामानंद नगर पोलीस स्टेशन येथे दरोडा सारखे गंभीर गुन्हा दाखल आहेत.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस अधीक्षक **सो. श्री. श्रीकांत धीवरे सर, मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो श्री.संदीप गावीत साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी (DYSP) श्री. नितीन गणापुरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जळगाव तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत पाटील,** सहाय्यक पोलीस निरीक्षक नयन पाटील पोलीस हवालदार प्रदीप राजपूत पोलीस हवालदार योगेश पाटील, पोलीस हवालदार अविनाश देवरे, कैलास इंगळे, पोह चालक पकंज देशमुख पोलीस कॉस्टेबल प्रशांत ठाकूर, मिलींद सपकाळे, गणेश पाटील यांनी केली आहे.

पोलीस निरीक्षक जळगांव तालुका पो.स्टे.

20.06.26

पोलीस निरीक्षक
जळगांव तालुका पो.स्टे.